# पुराणमतवादी काळात परिवर्तनकारी राजकारण

भारतातील समकालीन राजकीय अवकाशात 'परिवर्तनकारी' ('रॅडिकल' या अर्थाने) घटकांचं राजकारण त्यातील बदलाच्या सामर्थ्यामुळेच महत्त्वाचं ठरतं, असं नव्हे; तर, आपला मतदानाचा अधिकार नैतिक सत्तेच्या मागे उभे करण्यात लोक अपयशी ठरत असल्यामुळे परिवर्तनकारी राजकारणाचं महत्त्व विशेष अधोरेखित होतं. उदाहरणार्थ, कायदा आणि एकंदरच मानवता यांच्या चौकटीत लाजीरवाणी ठरणारी सर्व प्रकारची हिंसा नाकारण्यात मतदारांची नैतिक सत्ता सामावलेली असते. अशा हिंसेविषयी असहमती दर्शवली, तर नैतिक सत्तेचा योग्य वापर केल्याचं म्हणतायेतं. झुंडबळीच्या घटना अशी दुहेरी आव्हानं उभी करणाऱ्या आहेत. एका प्रदेशात व्यक्तीने वा राज्यसंस्थेने केलेल्या हिंसाचाराचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष विपरित परिणाम दुसऱ्या प्रदेशांमधील व्यक्तींवरही होतो. एका ठिकाणचा हिंसाचार वा स्वातंत्र्याचं दमन इतर प्रदेशांमधील लोकांनाही नैतिक अस्वस्थतेच्या गर्तेत लोटतं. आपल्याला स्वातंत्र्याची हमी मिळते किंवा नाही, यावर लोकांच्या प्रतिक्रियांमधील अस्वस्थता व साशंकता अवलंबून असते. स्वातंत्र्याचा सामाजिक अवकाश आणखी कमी करण्यासाठी, उदाहरणार्थ- विद्यमान सरकार व पुराणमतवादी (कन्झर्वेटिव्ह) घटक यांच्याशी निगडित, संस्था कोणती पावलं उचलतील, याविषयी लोकांना साशंकता वाटत असते. नैतिक अस्वस्थतेची अवस्था दूर करण्यासत सरकारी संस्थांना अपयश येतं, यातून मतदानाची मर्यादित सत्ताच सिद्ध होते. मतदानाची सत्ता म्हणजे त्या सत्तेच्या योग्यतेची हमी नव्हे.

मतदानाचा अधिकार वा सत्ता पुरेशी नसते. किंबहुना, अशी सत्ता पुराणमतवादी घटकांनाच सहाय्य करण्याची शक्यता असते. प्रजासत्ताक पद्धतीमध्ये लोकांच्या सत्तेला नैतिक सत्तेद्वारे सीमा आखून दिली जाते वा त्याद्वारे लोकांना जागरूक बनवलं जातं. त्यामुळे हिंसाचाराशी असहमती दर्शवण्यासाठी आवश्यक कार्यक्षमता मतदारांमध्ये निर्माण करण्यासंदर्भात नैतिक सत्तेने निर्णायक भूमिका पार पाडणं गरजेचं असतं. नैतिक सत्तेद्वारे आपोआप मतदानाची सत्ता योग्यतेच्या आदर्शलक्ष्यी चौकटीत येत नाही. मूलभूत स्वातंत्र्य आणि अहिंसा, हे या चौकटीचे दोन महत्त्वाचे संदर्भबिंदू आहेत. इथे एक प्रश्न उपस्थित करणं गरजेचं आहे : लोकांच्या मतदानासंदर्भातील निर्णयशक्तीवर नैतिक सत्तेचा कितपत निर्णायक प्रभाव पडतो? दुर्दैवाने या प्रश्नाचं उत्तर होकारार्थी देता येत नाही. मतदान करणारे सर्व लोक समोर दिसणाऱ्या हिंसाचाराच्या कृतींच्या बाबतीत केवळ बघ्याची भूमिका पार पाडतात. लोकांना स्वतःच्या नैतिक सत्तेचं उपयोजन करता आलं नाही, तर कोणाला तरी या परिस्थितीत हस्तक्षेप करण्यासाठी पुढाकार घ्यावा लागतो. लोक किंवा राज्यसंस्था आपापल्या नैतिक व घटनात्मक मर्यादांचं उल्लंघन करून प्रत्यक्षाप्रत्यक्षपणे हिंसाचारात सहभागी होत असेल, तर असा हस्तक्षेप आवश्यक ठरतो. उदाहरणार्थ, तथ्यशोधनासाठी पुढाकार घेऊन परिवर्तनकारी घटक वस्तुनिष्ठ सत्य मांडण्याचा प्रयत्न करत असतील, तर त्याचं महत्त्व लक्षात घ्यायला हवं.

विशेष म्हणजे, 'परिवर्तनकारी' घटक एखाद्या परिस्थितीत हस्तक्षेप करताना त्यांचा हेतू सरकारला

ललकारण्याचा असतो, लोकांशी संवाद साधणं त्यांच्या अग्रक्रमावर नसतं. पण त्यातील काही जण लोकांशी चर्चा करतात. हिंसाचाराबाबत असहमती दाखवण्यात विशिष्ट समाजघटकांची नैतिक सत्ता पराभूत होत असल्यामुळे, परिवर्तनकारी घटकांना सातत्याने हस्तक्षेप करणं भाग पडतं आहे. सरकारसमोर हे मुद्दे परिवर्तनकारी घटक उपस्थित करत असतात, आणि सरकार त्याकडे लगोलग दुर्लक्ष करतं. ही सगळी प्रक्रिया परिवर्तनकारी घटक आणि सामाजिकदृष्ट्या पुराणमतवादी घटक यांच्यातील 'सी-सॉ' खेळासारखी होऊन जाते. शिवाय, परिवर्तनकारी घटकांचा पवित्रा प्रतिक्रियावादी असल्यामुळे पुराणमतवादी लोक तातडीने त्यांच्यावर 'अमुक-द्रोही' किंवा 'तमुक-द्रोही' असा शिक्का मारून टाकतात.

झुंडीच्या हिंसाचाराबाबत असहमती दर्शवण्यासाठी नैतिक सत्ता जागरूकपणे वापरायला हवी, या मुद्द्यावर सर्वांनी समंजसपणे सहमती राखण्याची गरज आहे. परंतु, वास्तवात परिवर्तनकारी घटक आणि विविध प्रकारचे पुराणमतवादी यांच्यातील दुरावाच वाढत जातो. समाजातील दुर्बल घटकांबाबत अहिंसक वृत्ती राखावी याबाबत सहमती प्रस्थापित करण्याची गरज आहे, झुंडबळींबाबतही सार्वजनिक पातळीवर असहमती व्यक्त व्हायला हवी, पण त्याऐवजी परस्परांपासूनचा दुरावाच वाढतो आहे. हिंसाचाराबाबतची असहमती तत्काळ व्यक्त व्हायला हवी आणि जवळपास रोज ही असहमती अधोरेखित केली जायला हवी. केवळ मतदानाची वेळ आल्यावरच यावर चर्चा करणं पुरेसं नाही. अशी चर्चा लांबवत राहिलं, तर दरम्यानचा कालावकाश पुराणमतवादी घटक भरून टाकतील. अशा अवकाशामध्ये विचारांच्या बाबतीत पोलीसगिरी केली जाते, सत्याची कथनं दडपली जातात. सत्याचा आवाज संपवण्यासाठी सातत्याने ट्रोलिंगचा वापर केला जातो. परस्परांमध्ये समंजस सहमती निर्माण करण्यासाठी वास्तवाचा आदर्शलक्ष्यी वृत्तान्त समोर येणं आवश्यक असतं. एखाद्या हिंसक घटनेचे सार्वजनिक हिताच्या बाबतीत कोणते परिणाम होतात, ते लक्षात घेऊन असा आदर्शलक्ष्यी वृत्तान्त तयार करणं शक्य आहे. हिंसेचं सातत्य टिकवणारी राजकीय सत्ता असलेल्या जगातील कोणत्याही समाजाने कधीच सामाजिक प्रगती साधलेली नाही.

●

---

## परिघावरून परिणाम साधण्याच्या शक्यता

निवडणुकीय लोकशाहीमध्ये राजकीय परिघाविषयी चर्चा करणं विरोधाभासी वाटू शकतं. संसदीय लोकशाहीच्या समर्थनार्थ काही सैद्धान्तिक कारणं सातत्याने दिली जातात, त्यानुसार पाहिलं तर परिघाच्या बाजूने काही मांडणी करणं विसंगत वाटण्याची शक्यता आहे. आळीपाळीने होणारा बदल, हे संसदीय लोकशाहीचं मध्यवर्ती तत्त्व आहे. लोकशाही व्यवस्थेत संस्थात्मक सत्तेमधील नेते सातत्याने बदलणं अपेक्षित आहे. त्यामुळे औपचारिक अर्थाने परिघावर असलेले नेते या प्रक्रियेत सत्तेच्या केंद्रस्थानी येऊ शकतात, आणि सर्वोच्च स्थानावर असलेले नेते खाली फेकले जाऊ शकतात. लोकशाहीमध्ये निवडणुकीच्या प्रक्रियेतून हे स्थित्यंतर साधलं जाणं अभिप्रेत आहे. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, लोकशाही जीवनातील परिघ कधीही स्थिर वा कुंठित नसतो; केंद्राच्या दिशेने सरकण्याइतकी लवचिकता त्यांना प्राप्त झालेली असते. तरीही, भारतीय लोकशाहीमधील परिघ वैशिष्ट्यपूर्ण म्हणावा असा आहे; त्यांचं केंद्राशी असलेलं नातं विषम स्वरूपाचं आहे आणि केंद्रस्थानी असलेले लोक स्वतःची सत्ता अधिकाधिक दृढ करू पाहत आहेत- किमान पुढची काही वर्षं तरी आपणच केंद्रस्थानी राहू असा त्यांचा प्रयत्न आहे.

या राजकारणातील केंद्र भारतीय जनता पक्षाच्या

(भाजप) भोवती फिरतं. भारतातील राजकीय संभाषिताच्या अटी हाच पक्ष ठरवताना दिसतो आहे. समकालीन अवकाशात विरोधी पक्ष केवळ प्रतिक्रियावादी शक्ती बनून राहिले आहेत, यावरून ही वस्तुस्थिती स्पष्ट होते. या अवकाशाअंतर्गत लहान पक्ष वा परिघावरील पक्ष दुहेरी पद्धतीने काम करताना दिसतात. या पद्धती वरकरणी वेगळ्या दिसत असल्या तरी मूलतः त्या एकच आहेत. भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडीमध्ये (रालोआ) सहभागी असलेल्या लहान राजकीय पक्षांनी केंद्राच्या दिशेने सरकण्याचा प्रयत्नही सोडून दिलेला आहे. परिघावरील घटकांना आणि एकंदरच देशाला भेडसावणारे गंभीर प्रश्न हाताळून त्याविषयी स्वतंत्र भूमिका हे पक्ष घेत नाहीत. आपण परिघावरील समाजघटकांचे प्रतिनिधी आहोत, असा दावा करणारे पक्ष सावध भूमिका घेत आहेत, प्रांतिक राजकारणात राहून स्वतःच्या विशिष्ट हितसंबंधांचं रक्षण करण्यात ते धन्यता मानताना दिसतात. या संदर्भात काही प्रश्न उपस्थित करणं आवश्यक आहे : हे पक्ष खरोखरच परिघावरील आहेत का? केवळ निवडणुकीय राजकारणाचा विचार केला, तर हे पक्ष परिघावर असतीलही, पण आशयघन राजकारणाच्या संदर्भात त्यांनी केंद्रस्थानी असायला हवं. या पक्षांनी स्वतःचे विचार जोतिराव फुले व भीमराव रामजी आंबेकर यांसारख्या पथदर्शी विचारवंतांच्या मांडणीतून साकारलेले आहेत. त्यामुळे या विचारांच्या संदर्भात केंद्रस्थानी असण्याचे लाभ कोणते आहे, हे समजून घ्यायला हवं. दोन, या विचारवंतांकडून मिळालेल्या बौद्धिक पाठबळानुसार परिघावरील जनतेमधून राजकीय शक्ती निर्माण करण्याची संधी या पक्षांना अधिक प्रमाणात आहे. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, समाजातील संपन्न वर्गाला फुले व आंबेडकर यांच्या परिवर्तनकारी संकल्पनांमध्ये कोणताही रस असण्याचं कारण नाही. त्यामुळे त्यांच्या राजकीय जागृतीचा आदर्शलक्ष्यी आशय संपन्न असला, तरी त्याचं अभिसरण होण्याची गरज आहे. निवडणुकीच्या संदर्भातही परिघावरून राजकीय केंद्राकडे जाण्यासाठी ही अतिशय पूरक परिस्थिती आहे. तरीही, परिघावरून अधिकाधिक परिणाम साधणं या पक्षांना जमलेलं नाही. परिघाची ही संकल्पना विचाराच्या पातळीवर अतिशय सर्जनशील व आदर्शलक्ष्यी आहे आणि राजकारणाच्या पातळीवर परिवर्तनकारी आहे. प्रभुत्वसत्तेच्या प्रतिरोधार्थ होणाऱ्या प्रयत्नांना मोडून काढण्यासाठी प्रभुत्वसत्ताक शक्ती सर्व प्रकारचे दडपशाहीचे मार्ग वापरतात. पण लहान पक्षही प्रांतिक पातळीवर प्रस्तुत राहाण्यातच धन्यता मानतात, हेही तितकंच खरं आहे.

परिघावरून अधिकाधिक परिणाम साधायचा असेल, तर परिघावरील जनतेचं राष्ट्रव्यापी वा अखिल भारतीय पातळीवरचं संघटन करावं लागेल. या उर्ध्वगामी प्रक्रियेसाठी कठोर परिश्रम करावे लागतील. परंतु, हे नेते परिघावरील भिन्न समाजगटांच्या संघटनेवर लक्ष केंद्रीत करत राहिले, तर ही प्रक्रिया आडव्या स्वरूपात पसरते. हे प्रयत्न परिघावरील एका कप्प्यातून दुसऱ्या कप्प्यात जातात. देशातील दलित आणि इतर मागासवर्गीय राजकारणामध्ये सातत्याने गटतट निर्माण होत असतात, त्यात या संकुचित दृष्टिकोनाचं प्रतिबिंब पाहायला मिळतं. परिघामधेच घुटमळत राहाणं अशक्य ठरतं, त्यालाही बहुधा बाह्य घटकच कारणीभूत ठरत असावेत आणि अंतर्गतरित्या ते चिरस्थायी केले जात असावेत. प्रभुत्वसत्ताक राजकारण परिणामकारकरित्या करता यावं, यासाठी राजकीय पक्ष वरून ही प्रक्रिया लादतात. गतकाळाप्रमाणे वर्तमानातही सत्ताधारी पक्षांच्या गरजेपोटी परिघावरील पक्षांची उपस्थिती प्रभुत्वसत्ताक प्रकल्पाचा भाग होऊन जाते. त्याचप्रमाणे अशा लहान पक्षाचे नेते त्यांच्या विशिष्ट अस्मितेला चिकटून राहून परिघावरील समाजघटकांना आणि स्वतःलाही प्रभुत्वसत्ताक प्रकल्पाच्या वापरासाठी उपलब्ध करून देतात. या सामाजिक अस्मिता आशयाच्या अंगाने नव्हे, तर नावाच्या अंगानेच सार्वत्रिक

असतात. या अस्मिता टिकवून ठेवण्यासाठी परिघावरील पक्ष नवनवीन कारणं शोधत राहातात. अशा पक्षांच्या सदस्यांना अंशतः किंवा अलंकारिक अर्थाने स्वतःमध्ये सामावून घेण्याची क्षमता प्रभुत्वसत्तेला गरजेची असते. त्याचप्रमाणे निवडणुकीय लोकशाहीद्वारे अंमलात येणारा राजकीय प्रभुत्वसत्तेचा तर्क परिघावरील प्रत्येक उदयोन्मुख आवाजाला शांत करायचा प्रयत्न करतो. परिघावरील पक्षांकडील वैचारिक सामग्री व समर्थकांची संख्या मुबलक असली, तरी केंद्राकडे सरकणं त्यांना शक्य होत नाही, हा विद्यमान राजकीय वास्तवातील उपरोध म्हणावा लागेल.

●

## वस्तू व सेवा करामधील अडचणीचे मुद्दे

*नियमपालनाच्या नावाखाली जीएसटीमधील रचनात्मक पेच टाळण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे का?*

गेल्या तीन महिन्यांमध्ये भ्रष्टाचार व संबंधित आरोपांच्या कारणांवरून 'केंद्रीय अप्रत्यक्ष कर व सीमाशुल्क मंडळा'तील सेंट्रल बोर्ड ऑफ इनडायरेक्ट टॅक्सेस अँड कस्टम्स (सीबीआयसी) आयुक्त व अधीक्षक पदांवरील ३७ अधिकाऱ्यांना केंद्र सरकारने सक्तीची निवृत्ती घ्यायला लावली. २०१७-१८पासून दोन वर्षांच्या काळात वस्तू व सेवा कराची गुड्स अँड सर्व्हिसेस टॅक्स (जीएसटी) कामगिरी निराशाजनक झाल्याचा लेखापरीक्षण अहवाल महालेखापरीक्षकांनी कम्प्ट्रोलर अँड ऑडिटर जनरल (कॅग) अलीकडेच दिला, आणि त्यानंतरच यातील तीन पंचमांश कारवाया झाल्या. त्यामुळे, 'नोकराशाहीची साफसूफ' करण्याच्या नावाखाली एका दगडात दोन पक्षी मारण्याचा हा प्रयत्न आहे का, असा प्रश्न उपस्थित होतो.

'मूलभूत नियमां'मधील ५६(जे), 'केंद्रीय नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९७२'मधील नियम ४८, किंवा 'अखिल भारतीय सेवा (मृत्यू वजा निवृत्ती लाभ) नियम, १९५८'मधील (दुरुस्ती झालेला) नियम १६(३) यांद्वारे भ्रष्ट व अकार्यक्षम सरकारी कर्मचाऱ्यांवर केंद्र सरकारने केलेली कारवाई ही मूलतः प्रशासकीय व्यवस्थेची कार्यक्षमता पुनर्स्थापित करण्यासाठी असते, त्यामुळे ती प्रशंसनीयही ठरते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वातंत्र्य दिवसाच्या भाषणामध्ये करव्यवस्थेतील भ्रष्ट अधिकाऱ्यांचा उल्लेख 'कुजके आंबे' असा केला होता. प्रामाणिक करदात्यांना लक्ष्य करून किंवा लहान स्वरूपाचा वा प्रक्रियेच्या पातळीवरचा नियमभंग झाल्यास त्यावर अवाजवी कारवाई करून स्वतःच्या अधिकारांचा गैरवापर करणारे व करदात्यांना छळणारे काही कुजके आंबे कर प्रशासनामध्ये होते, असं मोदी म्हणाले. परंतु, घरभेद्यांवर कारवाई करण्याच्या उत्साहात हे सरकार खुद्द घराच्या रचनेतील त्रुटींकडे दुर्लक्ष करतं आहे का? शिवाय, अशा भुरट्या चोऱ्या रोखण्याची संधीही गमावतं आहे का?

अप्रामाणिक कर अधिकाऱ्यांची दखल सरकार घेत असेल तर अधिकारी व करदाता यांच्यातील संपर्क कमी करू शकणारी 'इनव्हॉइस मॅचिंग'सारखी व्यवस्था अजून लागू का झाली नाही? इनव्हॉइस मॅचिंगद्वारे करबुडवेगिरीला चाप बसेल, असे मानले जात होते. जीएसटीमधील करभरणा व प्रक्रियापूर्तता करण्यासाठीची व्यवस्था- विशेषतः एकात्मिक वस्तू व सेवा कराच्या इंटिग्रेटेड जीएसटी (आयजीएसटी) पूर्ततेची व्यवस्था १०० टक्के इनव्हॉइस मॅचिंगवर आधारलेली असणार होती. इनव्हॉइस मॅचिंगची व्यवस्था सक्रिय नसल्यामुळे ही उद्दिष्टे अजून साध्य झालेली नाहीत. शिवाय, अशा पडताळणीची यंत्रणा नसेल, तर इनपुट टॅक्स क्रेडिटसारखे फसवणुकीचे प्रसंग जीएसटी

व्यवस्थेत सातत्याने घडतील, असं कॅगच्या अहवालात म्हटलं होतं. इनव्हॉइस मॅचिंग आणि परताव्याची पूर्तता यांच्या अभावी करभरणा कमीच होत असल्याचं दिसतं आहे. सारांश परतावा अर्ज (जीएसटीआर३बी) भरणाऱ्या करदात्यांचं प्रमाण एप्रिल २०१८मध्ये ८७ टक्के होतं, ते डिसेंबर २०१८मध्ये ७९ टक्क्यांपर्यंत घसरलं. वस्तू व सेवांचा आंतरराज्यीय पुरवठा आणि आयात यांच्यावर आकारला जाणारा आयजीएसटी २०१७-१७मध्ये १,७६,६८८ कोटी रुपये होता, तो २०१८-१९मध्ये २८,९४७ कोटी रुपयांपर्यंत खाली आला. (पेट्रोलियम व तंबाखू यांच्यावरील केंद्रीय सीमाशुल्काचा अपवाद वगळता) जीएसटीमधून केंद्राला मिळणारा महसूल २०१६-१७च्या तुलनेत २०१७-१८मध्ये १० टक्क्यांनी कमी झाला.

आता आपण संपादकियाच्या सुरुवातीला नोंदवलेल्या दोन प्रश्नांकडे परत जाऊ. जीएसटी रचनेतील व्यवस्थात्मक समस्यांपासून अंग झटकण्याचा प्रयत्न सरकार करतं आहे का, या आपण उपस्थित केलेल्या दुसऱ्या प्रश्नाचं उत्तर 'नाही' असं आहे. उदाहरणार्थ, जीएसटी रचनेत मध्यवर्ती स्थान असलेल्या इनव्हॉइस मॅचिंगचा विचार करा. जीएसटी मंडळाच्या सुरात सूर मिळवून या कररचनेचे समर्थक मान्य करतील की, या व्यवस्थेशी पुरेशी ओळख नसल्यामुळे करदाते व करसंकलक यांना-किमान सुरुवातीच्या काळात तरी-इनव्हॉइस मॅचिंगसारखी प्रक्रिया अतिशय गरजेची ठरते. शिवाय, असे अंमलबजावणीशी निगडित प्रश्न टप्प्या-टप्प्याने सोडवले जातील. त्याचप्रमाणे नोव्हेंबर २०१७पासून दरात करण्यात आलेली कपात आणि त्याचा महसुलावर झालेला परिणाम यांकडेही लक्ष वेधले जाईल. जुलै २०१७पासून पुढील आठ महिन्यांमध्ये करपात्र क्षेत्राचा व्याप ६५ लाख रुपयांवरून १.२० कोटी रुपयांपर्यंत वाढला- म्हणजे त्यात ८४ टक्क्यांची वाढ झाली. यावरून सदर युक्तिवादाला चालना मिळते. पण या सर्व संभाषितामध्ये जीएसटीशी निगडित मूलभूत रचनात्मक प्रश्न दडपले जातीत. इतका व्यापक करपात्रतेचं क्षेत्र असूनही केवळ ५ टक्के करदाते ९५ टक्के कर भरतात, हा यातील महत्त्वाचा प्रश्न आहे.

तांत्रिक मुद्दे सोडवण्यात आले, तरीही करभरणा करणाऱ्यांची संख्या वाढणं अवघड आहे. कारण, जीएसटीमध्ये असंघटित क्षेत्राचा समावेश होत नाही किंवा या क्षेत्राला जीएसटीचा लाभही होत नाही. वास्तविक राष्ट्रीय उत्पादनातील सुमारे दोन तृतीयांश भार हे क्षेत्र उचलतं आणि ९० टक्क्यांहून अधिक रोजगार या क्षेत्रातून मिळतो. हे क्षेत्र इनपुट टॅक्स क्रेडिटसाठी बहुतांशाने पात्र ठरत नाही, पण उलट्या शुल्कामुळे संघटित क्षेत्राच्या तुलनेत असंघटित क्षेत्र (किंमतीच्या बाबतीत) आणखी कमी स्पर्धात्मक ठरते. आपण नोंदवलेल्या पहिल्या प्रश्नाकडे आता वळू. सीबीआयसीमधील अधिकाऱ्यांना प्रामाणिकपणा व लोकहिताच्या कारणावरून बडतर्फ करण्यात आलं, यात जीएसटी व्यवस्थेमधील काही त्रुटी दूर करणं हा हेतू नाही. उलट, जीएसटीमधील रचनात्मक पक्षपातीपणाविषयी सर्वसामान्यांमध्ये असलेली 'जागरूकता', हा या दगडात मारण्यात आलेला दुसरा पक्षी आहे. जीएसटीमधील रचनात्मक त्रुटींसमोर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यासाठी सक्षम राजकीय विरोधक नाहीत, त्यामुळे सरकारच स्वतःच्या विरोधकाची 'भूमिका' करू पाहतं आहे, त्यासाठी 'अंतर्मुख' हस्तक्षेपांसारखी अतिशयोक्तीही केली जाते आहे. यामध्ये प्रश्नांच्या व्यावहारिक आकलनाऐवजी नैतिक उद्वेगांवर जास्त भर दिला जातो.

●


## युनिक बुक्स

२रा मजला, देविदास आर्केड, पंचवटी चौक,
मोर्शी रोड, अमरावती ४४४ ६०४
दू. ०७२१-६५२१२४३

# कोळशाच्या खाणींमध्ये परकीय गुंतवणूक

*कोळशाच्या खाणकामामध्ये १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी दिल्याने उत्पादनाच्या संदर्भात व पर्यावरणीय पातळीवर अनेक धोके उत्पन्न होऊ शकतात.*

सरकारने केलेल्या धोरणात्मक बदलानंतर आता कोळशाची विक्री व कोळशाचे खाणकाम यांमध्ये आपोआप १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला (फॉरेन डायरेक्ट इनव्हेस्टमेन्ट : एफडीआय) परवानगी मिळाली आहे. शिवाय, 'कोळसा खाणी (विशेष तरतुदी) अधिनियम, २०१५' आणि 'खाणी व खनिजे (विकास व नियमन) अधिनियम, १९५७' या कायद्यांन्वये, आणि त्यात कालांतराने झालेल्या दुरुस्त्यांनुसार कोळशाशी निगडित पायाभूत प्रक्रियांमध्येही एफडीआयला मोकळी वाट करून देण्यात आली आहे. आधीच्या धोरणानुसार केवळ सीमित उपभोगासाठीच (कॅप्टिव्ह कन्झम्पशन) अशी गुंतवणूक करण्याची मुभा होती. विशेषतः कोळसा व लिग्नाइट यांचा ऊर्जा, पोलाद व सीमेन्ट उद्योगांपुरता सीमित उपभोग करण्याच्या क्षेत्रात १०० टक्के एफडीआयला परवानगी होती. परंतु, धुतलेला कोळसा केवळ कच्च्या कोळशावर प्रक्रिया करणाऱ्या प्रकल्पांना पुरवण्याचीच मुभा कंपन्यांना होती, खुल्या बाजारपेठेत हा कोळसा विकता येत नसे. बदललेल्या धोरणानुसार मात्र खुल्या बाजारपेठेत विकण्यासाठी कोळशाचे उत्खनन करण्याची परवानगी परकीय कंपन्यांना देण्यात आली आहे. शिवाय, धुणे, चिरडणे व कोळसा हाताळणी, नकोसे घटक वेगळे काढणे, अशा 'सहायक पायाभूत रचनां'मध्येही या कंपन्यांना मोकळी वाट करून देण्यात आली आहे.

कोळसा खाणींच्या उद्योगाचे नियमन करणारं हे नवीन धोरण विविध कारणांमुळे महत्त्वाचं ठरतं. एक, जगातील सर्वांत मोठ्या कोळसासाठ्यांपैकी काही भारतामध्ये आहेत– सुमारे २८६ टन कोळसा भारतात आहे. भारतातील कोळशाच्या खाणकामाची व्याप्ती जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. प्राथमिक ऊर्जेसाठी सर्वांत मोठा व्यापारी स्रोत पुरवणारा हा एक महत्त्वाचा उद्योग आहे. एक महत्त्वाची कच्ची सामग्री असलेला कोळसा मुख्यत्वे ऊर्जा प्रकल्पांमध्ये आणि धातुप्रक्रिया व सीमेन्ट उद्योगांमध्ये वापरला जातो. त्यामुळे, एकंदर अर्थव्यवस्थेच्या वाढीमध्ये या उद्योगाची कळीची भूमिका आहे.

दोन, भारतातील देशांतर्गत कोळशाची मागणी आणि उत्पादनाची उद्दिष्टे पूर्ण करणं कोल इंडिया लिमिटेडला (सीआयएल) शक्य होत नसल्यामुळे कोळशाची आयात केली जाते आहे. कोळशाच्या अपुऱ्या पुरवठ्यामुळे ऊर्जाप्रकल्प त्यांच्या क्षमतेपेक्षा कमी उत्पादन करत आहेत. ही मागणी भरून काढण्यासाठी देशात कोळशाची आयात आवश्यक ठरली. परंतु, कोळशाची आयात देशांतर्गत कोळशाच्या किंमतीपेक्षा जास्त किंमतीने होते आहे. २०१८–१९ या वर्षात भारताने २३ कोटी ५० लाख टन कोळसा आयात केला. शिवाय, बिगरकिनारपट्टी औष्णिक प्रकल्पांसाठी १२ कोटी ५० लाख टन कोळसा आयात करण्याकरिता भारताने सुमारे ८ अब्ज डॉलर खर्च केले. वाढती आयात आणि त्यासाठी मोजली जाणारी वाढती किंमत, याचा विपरित परिणाम म्हणून चालू खात्यात तुटवडा निर्माण झाला. उदारमतवादी धोरणांच्या अंमलबजावणीनंतर परकीय कोळसा खाणकाम कंपन्यांच्या प्रवेशाचा मार्ग मोकळा झाला, त्यामुळे आता देशांतर्गत उत्पादनही वाढेल, अशी अपेक्षा वर्तवली जाते आहे. शिवाय, आता कोळसा शोधण्याची नवीन तंत्रज्ञानं आणि खाणकामाच्या नवीन पद्धती भारतात येतील, विशेषतः जागतिक खाणकाम कंपन्या वापरत

असलेलं जमिनीखाली खाणकाम करण्याचं प्रगत तंत्रज्ञान देशात येईल, त्यातून खर्च कमी होईल, असंही गृहित धरलं जातं आहे.

तीन, या नवीन धोरणामुळे कोळसा उद्योग स्पर्धेसाठी खुला होईल. आत्तापर्यंत या क्षेत्रामध्ये केवळ सीआयएल या सरकारी कंपनीची मक्तेदारी होती. देशात कोळशाचं खाणकाम व विक्री करण्याची परवानगी केवळ सीआयएलला होती. त्यानंतर सीआयएलसोबत सीमित खाणी असलेल्या खाजगी व सार्वजनिक कंपन्यांना खाणकाम करून खुल्या बाजारपेठेत २५ टक्के कोळसा विकण्याची परवानगी देण्यात आली. सरकारची ७०.९६ टक्के मालकी असलेल्या सीआयएलने २०१८-१९ साली भारतामधील ८३ टक्के कोळशाचं उत्पादन केलं, त्यांपैकी ८१ टक्के कोळसा केवळ ऊर्जा क्षेत्राच्या गरजा भागवण्यासाठी खर्च झाला. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी सीआयएलला कामकाजाचा खर्च कमी करावा लागेल, शिवाय कमी उत्पादकतेची समस्या सोडवावी लागेल.

चार, नवीन कोळसा खाणकाम धोरणामुळे आता कोळशाच्या खाणींचा लिलाव आणि वाटप, पर्यावरणीय आणि वनविषयक मंजुरी, जमिनीचं वाटप, इत्यादी पूरक धोरणांच्या अंमलबजावणीलाही गती मिळेल. मूळ धोरणात अपेक्षित असलेलं उद्दिष्ट गाठण्यासाठी केवळ एफडीआयसंबंधीचे नियम बदलून भागणार नाही, तर या पूरक धोरणांमध्येही बदल करणं अपरिहार्य ठरेल. नवीन कंपन्यांच्या प्रवेशामुळे कालबद्ध मर्यादेत वेगाने मंजुरीप्रक्रिया राबवावी लागेल. उत्पादनासमोरील धोके टाळण्यासाठी नियमनं व मंजुऱ्या यांमधील अस्थिरता कमी करावी लागेल. नियमनविषयक जोखीम जास्त असेल अशी- विशेषतः नैसर्गिक संसाधनांशी संबंधित- क्षेत्रं परकीय कंपन्या टाळतात. भूसंपादन व इतर परवाने यांच्याशी संबंधित जोखीम परकीय कंपन्यांच्या प्रवेशाला खीळ घालू शकते.

सीमित कोळसा खाणींमधील खाजगी गुंतवणूक अगदी अत्यल्प राहिली आहे, कारण त्यात उत्पादनाशी निगडित जोखीम जास्त आहे. या उद्योगात नव्याने प्रवेश करणाऱ्या कंपन्यांना नवीन कोळसा खाणी विकत घेऊन त्यांचा विकास करावा लागेल. त्यामुळे प्रत्यक्षातील व्यावसायिक कामकाज सुरू होण्यासाठी काही तयारीचा कालावधी द्यावा लागेल, त्यात मोठी आर्थिक गुंतवणूक करावी लागेल. शिवाय, लिलावप्रक्रिया व पर्यावरणीय मंजुऱ्या, अपुरी पायाभूत रचना, आणि जमीन उपलब्धतेशी संबंधित प्रश्न सोडवणं- हे सगळे टप्पे पार केल्यानंतरच नवीन कंपन्यांना खाणकामात १०० टक्के एफडीआयचा मार्ग मोकळा होईल. नफादायकतेवरील मर्यादांमुळेही नवीन कंपन्यांचा व गुंतवणुकीसाठीचा उत्साह कमी राहाण्याची शक्यता आहे.

परंतु, नैसर्गिक संसाधनांच्या शाश्वत विकासाच्या दृष्टिकोनातून पाहिलं, तर या धोरणामुळे अमर्यादित खाणकामाला सुरुवात होईल, आणि पर्यावरण व परिसंस्था यांच्याविषयी असमतोल निर्माण होईल. 'अनुसूचित जमाती व इतर पारंपरिक वननिवासी (वनहक्क मान्यता) अधिनियम, २००६' या कायद्याद्वारे आणि इतर काही नियमांद्वारे वनसंसाधनांवर स्थानिक लोकांना सामुदायिक अधिकार देण्यात आले आहेत. परंतु, परकीय गुंतवणुकीसाठी स्पर्धा करणारी राज्यं आता या कायद्यांचा भंग करतील का, त्यातून आदिवासी समुदायांच्या उपजीविकेवर विपरित परिणाम होऊन विस्थापनात वाढ होईल का, असेही प्रश्न यातून समोर येतात. परकीय गुंतवणुकीचा ध्यास घेतल्याने नियमांच्या अंमलबजावणीबाबत कुचराई केली जाईल का? अशा शंका निवळवण्यासाठी आणि शाश्वत विकासाचं व्यापक उद्दिष्ट साधण्यासाठी खाणकंपन्यांवर कठोर नियमनं व सुरक्षाविषयक नियम लादायला हवेत. पर्यावरणाशी संबंधित कायदे व नियम यांच्यासोबतच खाण कामगारांचं आरोग्य व सुरक्षितता यांच्याशी नियमांचंही पालन या कंपन्यांकडून होईल, याची खातरजमा करायला हवी. ●

# प्रसारमाध्यमं कोणाला उत्तरदायी आहेत?

*प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाने स्वतःचा अधिकार व उद्दिष्टं यांची तपासणी करायला हवी.*

प्रसारमाध्यमांनी जमिनीवरील घडामोडींचा सूक्ष्म अदमास घ्यायला हवा, एवढंच नव्हे तर तळपातळीवरील लोकांशी त्यांचा जवळचा संपर्क असायला हवा, हे लक्षात आणून देणाऱ्या दोन घटना अलीकडेच भारतीय माध्यमांच्या अवकाशात अलीकडे घडल्या. शेवटी लोकांचं मत (मुख्यत्वे निवडणुकांमधून व्यक्त झालेलं, पण इतर मंचांवरून व्यक्त होणारं मतही महत्त्वाचंच असतं) हाच लोकशाही सरकारचा मूलाधार असतो. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी अधिकारीसंस्थांपासून आणि सरकारी नियंत्रणापासून अंतर राखायला हवं, तरच कोणत्याही बंधनांशिवाय स्वतःचं म्हणणं मांडणं त्यांना शक्य होईल. गेल्या आठवड्यात उत्तर प्रदेशातील मिर्झापूर इथल्या पोलिसांनी एका पत्रकाराविरोधात गुन्हेगारी कट रचल्याची तक्रार दाखल केली. एका प्राथमिक शाळेतील मुलांना मध्यान्ह आहार म्हणून चपातीसोबत भाजी म्हणून फक्त मीठ दिले जात होते, हे उघडकीस आणल्याबद्दल संबंधित पत्रकारावर ही कारवाई झाली. त्याच्या काही दिवस आधी, जम्मू-काश्मीरमध्ये संवादमाध्यमांवर लादलेल्या बंधनांविरोधात एका पत्रकाराने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती, त्यामध्ये हस्तक्षेप करण्यासाठी प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाचे (पीसीआय) विद्यमान अध्यक्षांनी पुढाकार घेतला; ते निवृत्त न्यायाधीश आहेत.

दोन्ही प्रकरणांमधील विरोधाभास उघड व अस्वस्थकारक होता. पहिल्या प्रकरणात, उघडकीस आलेल्या प्रश्नावर उपाय करण्याऐवजी बातमी फोडणाऱ्यावरच कारवाई केली जाते आहे. तर, दुसऱ्या प्रकरणात, माध्यमस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी स्थापन झालेली संस्थाच माध्यमांवरील बंधनांच्या बाजूने बोलताना दिसली. पीसीआयने स्वतःच्या आदर्शलक्ष्यी अधिकाराच्या विरोधात जात स्वतःच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला.

लोकशाही समाजामध्ये प्रसारमाध्यमं स्वतंत्रही असायला हवीत आणि जबाबदारीचं भानही त्यांना असायला हवं, या संकल्पनेतून प्रेस कौन्सिल ऑफ इंडियाची स्थापना झाली. स्वातंत्र्याचा वापर जबाबदारीने व्हायला हवा, यात काही शंका नाही. पण इथे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो: प्रसारमाध्यमं अंतिमतः कोणाला जबाबदार/उत्तरदायी असतात? देशातील लोकांना माध्यमं उत्तरदायी असतात, असं याचं उघड उत्तर आहे. पीसीआयची स्थापना झाली तेव्हा एक कारण असं देण्यात आलं होतं की, सरकार वा अधिकारीसंस्था यांचं नियंत्रण प्रसारमाध्यमांसाठी विध्वंसक ठरू शकतं, त्यामुळे प्रसारमाध्यमांचं नियमन या व्यवसायातील लोकांनीच व्यवसायाबाहेरील लोकांच्या सहकार्याने करणं योग्य ठरेल. त्यासाठी उचित रचना असलेली, प्रातिनिधिक व निष्पक्षपाती यंत्रणा उभारण्यात आली. पीसीआय ही 'कणाहीन' संस्था आहे, अशी टीका गेल्या काही दशकांमध्ये वेळोवेळी झालेली आहे. पण अनेक प्रकरणांमधील पीसीआयच्या भूमिकेची प्रशंसाही करण्यात आली आहे. यासंबंधीची काही उदाहरणं इथे नोंदवणं रास्त राहील. पंजाबमध्ये १९९०च्या दशकारंभी मोठ्या प्रमाणात सशस्त्र बंडखोरी होत होती, तेव्हा प्रसारमाध्यमांना पीसीआयने निःसंदिग्ध पाठिंबा दिला होता. अयोध्येतील मंदिरासाठीच्या आंदोलनावेळीही पीसीआयने प्रशंसनीय भूमिका घेतली- जमातवादी धृवीकरण करणाऱ्या एका समुदायाच्या बाजूने पक्षपाती वार्तांकन वर्तमानपत्रांनी करू नये, अशी सूचना पीसीआयने केली होती.

परंतु, आता काश्मीरमधील पत्रकाराच्या याचिकेमध्ये

हस्तक्षेप करताना पीसीआयच्या अध्यक्षांनी स्वतःच्या कृतीचं समर्थन करताना म्हटलं आहे की, राष्ट्रहित व ऐक्य अबाधित ठेवण्यासाठी त्यांनी या खटल्यात हस्तक्षेप केला. काश्मीरमध्ये ५ ऑगस्टपासून संदेशन-माध्यमांवर आणि पत्रकारांच्या हालचालींवर लादण्यात आलेली बंधनं उठवण्याचे आदेश सरकारला द्यावेत, अशी याचिका 'काश्मीर टाइम्स'च्या कार्यकारी संपादकांनी सर्वोच्च न्यायालयात केली. या निर्बंधांमुळे काश्मीरमध्ये 'ब्लॅकआउट'ची स्थिती निर्माण झाली, माध्यमांची कोंडी झाली आणि आपल्यावर परिणाम करणाऱ्या निर्णयांविषयी जाणून घेण्याचा अधिकार लोकांना नाकारला जातो आहे, असं याचिकेत म्हटलं आहे. इथेच या प्रश्नातला कळीचा मुद्दा आहे. विशिष्ट प्रश्नावर आपली मतं ठरवण्यासाठी लोकांना माहिती उपलब्ध होणं राष्ट्रहिताचं नाही का? मग मतदारांनी त्यांचे निर्णय कशा प्रकारे घेणं अभिप्रेत आहे? काश्मीर खोऱ्यात काय घडतंय, याची तळपातळीवरील माहिती भारतीय प्रसारमाध्यमांद्वारे उपलब्ध होत नसल्याचं आता स्पष्ट झालं आहे.

भारतीय प्रसारमाध्यमांचा देदिप्यमान इतिहास अगदी १८५७च्या स्वातंत्र्ययुद्धापर्यंत मागे जातो. या माध्यमांच्या मार्गावर- विशेषतः एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीला- अनेक शौर्याचे, जोखमीचे व त्यागाचं प्रदर्शन करणारे प्रसंग घडले आहेत. यातील अनेक पत्रकार समाजसुधारक व स्वातंत्र्यसैनिकही होते, त्यांच्याकडली थोडीथोडकी भौतिक संसाधनं ते विविध भाषांमधील प्रकाशनं काढण्यासाठी वापरायचे, यात इंग्रजी प्रकाशनांचाही समावेश होता. याबद्दल त्यांना ब्रिटिश सरकारकडून क्रूर दंडात्मक कारवाईला सामोरंही जावं लागायचं, पण त्यांचे प्रयत्न खचायचे नाहीत.

पीसीआयच्या अध्यक्षांनी केलेल्या कृतीचा अनेक पत्रकारांनी व माध्यमसंस्थांनी स्वतंत्रपणे जाहीर निषेध केला, ही दिलासा देणारी बाब आहे. न्यायालयात अर्ज करण्यापूर्वी अध्यक्षांनी संस्थेतील काही सदस्यांशी सल्लामसलत केली नव्हती, अशाही बातम्या आल्या आहेत. या संदर्भात पीसीआयच्या अध्यक्षांनी पत्रकारांच्या समुदायासोबतच जनतेसमोरही स्पष्टीकरण द्यायला हवं, तशी मागणी माध्यमांनी त्यांच्याकडे करायला हवी.

वार्तांकनाचं स्वातंत्र्य असलेली प्रसारमाध्यमं दोन महत्त्वाची कार्यं पार पाडतात. एक, शासनविषयक मुद्द्यांवर लोकांना निर्णय घेता यावा, यासाठी माहिती देण्याचं काम माध्यमं करतात. दोन, लोकांना- विशेषतः दुर्बल समाजघटकांना व ज्यांचे आवाज ऐकले जात नाहीत त्यांना- त्यांच्या तक्रारी व सूचना मांडण्यासाठीचा मंच माध्यमं उपलब्ध करून देतात. ही दोन कार्यं राष्ट्राचं ऐक्य अबाधित ठेवणारीच नाहीत का?

●

---

## ॲमेझॉनच्या जंगलातील भडकत्या ज्वाळा

*हवामानबदल आणि देशी समुदायांवर होणारं आक्रमण, हे प्रश्न जैर बोल्सोनारो यांनी नाकारले आहेत. त्यामुळे हे संकट आणखी गंभीर होते.*

ॲमेझॉनची महाकाय वर्षावनं (रेनफॉरेस्ट) म्हणजे ५५ लाख चौरस किलोमीटरांचं कार्बनशोषक क्षेत्र आहे, तिथल्या काही ठिकाणांवरून अलीकडे भयानक धुराचे लोट उठले. आत्तापर्यंतची ही सर्वांत भीषण आग होती, तिच्या परिणामी ब्राझीलच्या पूर्वेकडील समुद्रकिनाऱ्यावरचं आकाश धुराने भरून गेलं. देशातील सर्वाधिक लोकसंख्या या भागात राहाते. आगींच्या घटनांमध्ये २०१८ सालच्या तुलनेत या वर्षी ८४ टक्क्यांनी वाढ झाल्याचं ब्राझीलमधील राष्ट्रीय अंतराळ संशोधन संस्थेने (नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्पेस रिसर्चः

आयएनपीई) म्हटलं आहे. जगातील सर्वाधिक जैवविविधता राखणाऱ्या प्रदेशांपैकी एक असलेल्या ॲमेझॉनमध्ये या वर्षात आत्तापर्यंत ७४ हजारांहून अधिक आग लागण्याच्या घटना घडल्या. कोरड्या मोसमात आगी लागण्याचे प्रकार अस्वाभाविक नाहीत. पण या वर्षी लागलेल्या आगी टोकाच्या होत्या. त्यामुळे यासंबंधी जागतिक पातळीवर चिंता व्यक्त होते आहे.

ॲमेझॉनमधील बहुतांश वृक्षतोड अनुभवलेल्या १० महानगरपालिकांच्या क्षेत्रात या वर्षी सर्वांत विध्वंसक आगी लागल्या, असं अमेझॉन एन्व्हायर्नमेन्टल रिसर्च इन्स्टिट्यूटमधील (आयपीएएम) वैज्ञानिकांनी म्हटलं. २०१६ सालचा दुष्काळही या आगींना अंशतः कारणीभूत ठरला आहे, पण आयपीएएममधील वैज्ञानिकांच्या म्हणण्यानुसार, या आगी दुष्काळामुळे किंवा कोणत्याही निसर्गचक्राचा भाग म्हणून लागल्या हे गृहितप्रमेय 'नाकारायलाच हवं.' किंबहुना, 'कोरडा मोसम असूनही ॲमेझॉनमधील आर्द्रतेची पातळी गेल्या तीन वर्षांच्या तुलनेत सध्या सरासरीपेक्षा जास्त आहे,' असं वैज्ञानिक सांगतात. आयपीएएम व डिफॉरेस्टेशन अलर्ट सिस्टम यांनी केलेल्या कामांच्या आधारे वैज्ञानिक म्हणतात की, 'वृक्षतोडीमुळे आगींना जोर मिळतो आहे, हेच यामागचं एकमेव वाजवी कारण आहे.'

ब्राझीलचे राष्ट्राध्यक्ष जैर बोल्सोनारो यांचा हवामान विज्ञानावर किंवा वैज्ञानिक वनीकरणावर वा वनसंवर्धनावर विश्वास नाही. ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीला आयएनपीईचे अध्यक्ष रिकार्डो गल्वाओ यांनी इशारा दिला होता की ब्राझीलमधील वृक्षतोडीचा दर अतिरिक्त वाढलेला आहे. ॲमेझॉनच्या जंगलाने २,०७२ चौरस किलोमीटर भाग- म्हणजे माली देशाहूनही मोठा प्रदेश- वनीकरणामध्ये गमावला आहे, असं ते जून २०१९मध्ये म्हणाले होते. बोल्सोनारो यांनी हे सर्व 'खोटं' असल्याचं सांगत गल्वाओ यांना बडतर्फ केलं. लाकूडतोड, खाणकाम व शेतीपूरक उद्योग यांना झुकतं माप देत बोल्सोनारो यांनी 'ब्राझील पर्यावरण व अपारंपरिक नैसर्गिक संसाधनं संस्थे'ला (आयबीएएमए) मिळणारा निधी २०१९ सालच्या पूर्वार्धात २० टक्क्यांनी कमी केला. आयबीएएमएचे अधिकारी नियमांची अंमलबजावणी खूपच उत्साहाने करत आहेत; 'प्रत्येक वेळी ते पेन घेऊन येतात आणि अव्वाच्यासव्वा दंड लावतात', असं बोल्सोनारो म्हणाले. ॲमेझॉन व्यवसायासाठी खुलं आहे, हेही त्यांनी सांगितलं.

लाकूडतोड, खाणकाम व शेतीपूरक उद्योग यांच्या दृष्टीने ॲमेझॉनच्या जंगलातील आदिवासी समुदायांची उपस्थिती अडथळा ठरते. वनांचं रूपांतर क्रयवस्तूमध्ये करण्याला आदिवासींनी प्रतिकार केला. ब्राझीलच्या १९८८ सालच्या राज्यघटनेने आदिवासी समुदायांसाठी- विशेषतः ॲमेझॉनमध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणात आरक्षित प्रदेश तयार केले (ब्राझीलची ०.६ टक्के लोकसंख्या आदिवासी समुदायांमधील आहे). या समुदायांबाबत बोल्सोनारो व त्यांच्या उजव्या विचारसरणीच्या समर्थकांची वृत्ती जनसंहाराची आहे. यावनावा समुदायाचे नेते तश्का यावनावा यांच्या मते, ॲमेझॉनमधील आदिवासी लोक 'जनसंहारा'ला सामोरे जात आहेत.

या आगी संवर्धनवादी बिगरसरकारी संस्थांमुळे लागत आहेत, असा ठपका बोल्सोनारो यांनी ठेवला आहे. ब्राझीलची लाज जावी आणि व्यवसायाभिमुख कार्यक्रमाला खीळ बसावी यासाठी अशा संस्थांनी जाणीवपूर्वक या आगी लावल्याचा आरोप त्यांनी केला. त्यांच्या या दाव्याला आधार देणारा कोणताही पुरावा नाही. ब्राझीलच्या विद्यमान राष्ट्राध्यक्षांचं आणखी एक भडकाऊ विधान, एवढाच याला अर्थ आहे.

बोल्सोनारो यांच्याविरोधातील रोष ऑगस्टच्या शेवटच्या दोन आठवड्यांमध्ये टोकाला पोचला. अलीकडेच देशभरात लोकांनी निदर्शनं केली. रिओ दे जनेरो व साओ पाओलो ही शहरं आंदोलनाच्या केंद्रस्थानी होती. या निदर्शनांमध्ये देण्यात आलेल्या घोषणा लोकभावना व्यक्त करणाऱ्या होत्या- 'ॲमेझॉन लोकांचं आहे' आणि 'ॲमेझॉन राहील, बोल्सोनारो

जाईल'. बोल्सोनारो यांची सत्ता मान्य असलेल्या लोकांचं प्रमाण वेगाने खाली आलं आहे. सीएनटी/एमडीए संस्थेने केलेल्या मतचाचणीनुसार, सर्वेक्षित लोकांपैकी ३९.५ टक्के लोकांच्या मते, सध्याचं सरकार 'वाईट किंवा भीषण' आहे. व्यक्तीशः बोल्सोनारो यांचं नेतृत्व मान्य असणाऱ्यांचं प्रमाण आता २९.४ टक्क्यांवर आलं आहे (जानेवारी महिन्यात ते ३८.९ टक्के होतं). ॲमेझॉनमधील आगी, बोल्सोनारो यांची अवैज्ञानिक प्रतिक्रिया आणि निदर्शनं यांमुळे सरकारवर दबाव वाढला.

युरोपातून बोल्सोनारो यांच्यावर उघडपणे टीका होऊ लागली आणि त्यांच्या दोन मुख्य व्यापारी व धोरणात्मक उद्दिष्टांना धोका निर्माण झाला, त्यानंतर परिस्थिती आणखी चिघळली. ब्राझीलहून गोमांसाची आयात थांबवावी, यासाठी युरोपीय शेतकऱ्यांनी युरोपीय संघावर दबाव आणला. हे तसंही ब्राझील सरकारला बाधा पोचवणारं होतं, पण शेवटी हा दबाव इतका वाढला की, मर्कोसूर (अर्जेन्टिना, ब्राझील, पॅराग्वे, उरुग्वे व व्हेनेझुएला यांची एकत्रित संघटना) या गटासोबतच्या व्यापारी करारामधून युरोपीय संघ माघार घेईल असा इशाराही देण्यात आला. 'ऑर्गनायझेशन फॉर इकनॉमिक को-ऑपरेशन अँड डेव्हलपमेन्ट' (ओईसीडी) या स्वतःला 'विकसित' मानणाऱ्या ३६ देशांच्या संघटनेत ब्राझीलचा समावेश होईल, अशी आशा बोल्सोनारो यांना होती. पण आता या संघटनेतील ब्राझीलच्या प्रवेशावर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे.

फ्रान्समध्ये झालेल्या जी-७ देशांच्या बैठकीत ॲमेझॉनमधील संकटाची चर्चा करण्यासाठी विशेष सत्राचं आयोजन करण्यात आलं होतं. बोल्सोनारो यांच्याशी जवळीक असलेले अमेरिकी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प या वेळी उपस्थित राहिले नाहीत. आगींशी लढण्यासाठी दोन कोटी डॉलर अशी अत्यल्प रक्कम पुरवायचं आश्वासन जी-७ गटाने दिलं. हा पैसा 'ॲमेझॉनवर गैरवाजवी आणि फुकटचा हल्ला' करणारा आहे, असं सांगत बोल्सोनारो यांनी मदत नाकारली. परंतु, दबाव वाढल्यामुळे त्यांनी आग थोपवण्यासाठी सैन्यदलांना पाचारण केलं. ॲमेझॉनची वनं आणि तिथे राहाणारे लोक यांचं अंगभूत मूल्य जाणवल्यामुळे ही कृती केलेली नाही, तर केवळ व्यावहारिक चिंतांपोटी हा दुबळा प्रतिसाद दिला आहे.

दरम्यान, ब्राझीलमधील आग बोलिव्हियात पसरली आहे. तिथले राष्ट्राध्यक्ष इव्हो मोरालीस यांनी आग विझवण्यासाठी तातडीने पावलं उचलत एक सुपर-टँकर मागवला. बोलिव्हियामध्ये 'भूमातेचा कायदा' आहे, त्यात निसर्गाला माणसांसमान मानून अधिकार देण्यात आले आहेत. पर्यावरणीय व मानवी संकट उद्भवल्यावर, त्यासंबंधी सरकारांची भूमिका कशी असेल, हे त्या-त्या सरकारच्या राजकीय-विचारसरणीय कलानुसार ठरतं, हे या दोन देशांच्या प्रतिसादांमधील तफावतीवरून दिसतं. त्यामुळे न्याय्य व सभ्य सामाजिक-राजकीय व्यवस्था निर्माण करण्यासाठीचा संघर्ष आणि ॲमेझॉनला वाचवण्याचं कार्य, यांच्यात फारकत करून चालणार नाही. ●

---

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (दि. ३१ ऑगस्ट व ७ सप्टेंबर या अंकांतून. 'पुराणमतवादी काळात परिवर्तनवादी राजकारण' आणि 'परिघावरून परिणाम साधण्याच्या शक्यता' ही दोन संपादकीये गोपाळ गुरू यांनी लिहिली आहेत.)


## परिवर्तनाचा वाटसरूचे अंक मिळण्याची ठिकाणे

**मीडिया ॲडस्**

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू काँप्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४

**अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन**

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर, प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०